शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट-ब (राजपत्रित), गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवा, पदोन्नती व प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यासंदर्भात नियुक्ती प्राधिकारी घोषित करणेबाबत....

## महाराष्ट्र शासन
### सामान्य प्रशासन विभाग
### शासन निर्णय क्रमांकः शापसे-३४२५/प्र.क्र.८६/राशि-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
तारीख: ६ मे, २०२६

**वाचा :**

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक- एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२९०/कार्या-१२, दिनांक १९ नोव्हेंबर २०१६
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-संकीर्ण-३५१७/प्र.क्र.१४७/१९अ, दिनांक १७ मार्च २०१८
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-शापसे-३४१७/प्र.क्र.१५४/का-३१(शापसे), दिनांक २८ जुलै २०२२
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-शापसे-३४२५/प्र.क्र.८६/का-राशि-३, दिनांक ७ ऑगस्ट २०२५

**प्रस्तावना :**

उपरोक्त संदर्भाधीन-२, दिनांक १७ मार्च २०१८ अन्वये वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-एक, अनुक्रमांक-१ ते ३ मधील तरतुदीनुसार शासकीय परिवहन सेवा, मुंबई या कार्यालयासाठी अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांना प्रशासकीय विभाग प्रमुख, उपसचिव तथा पदसिद्ध संचालक (शासकीय परिवहन सेवा) यांना विभाग प्रमुख, नियंत्रक (शासकीय परिवहन सेवा) यांना प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख म्हणून

घोषित केलेल्या आदेशाच्या क्रमांकासह प्रपत्र-१ ते प्रपत्र-४ मध्ये अद्ययावत यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. उपरोक्त संदर्भाधीन-३, दिनांक २८ जुलै २०२२ च्या शासन निर्णयान्वये या विभागाच्या अधिपत्याखाली शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील नियमित १३८ नियमित व बाह्ययंत्रणेव्दारे १७ अशा एकूण १५५ पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे.

३. गट-अ व गट-ब (राजपत्रित) अधिकाऱ्यांच्या तसेच गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणुका / पदस्थापना करताना संबंधित प्रकरणी कोणत्या स्तरावर अंतिम निर्णय घ्यावेत या अनुषंगाने उपरोक्त संदर्भाधीन-१, दिनांक १९ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती प्राधिकारी घोषित केले आहेत. तसेच याच शासन निर्णयातील परिच्छेद-२ मधील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील पदांवर सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने करावयाच्या नेमणुका / पदस्थापना प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी कोण असतील यासंदर्भात संबंधित प्रशासकीय विभागांनी पदनिहाय नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे पदनाम स्वतंत्र आदेशान्वये घोषित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणुका / पदस्थापना करण्याच्या प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्यासाठी नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## <u>शासन निर्णय :</u>

उपरोक्त संदर्भाधीन-४, दिनांक ७ ऑगस्ट २०२५ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

२. शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या सरळसेवेने, पदोन्नतीने वा प्रतिनियुक्तीने नेमणुका / पदस्थापना करण्याच्या प्रकरणावर अंतिम निर्णय घेण्यासाठी खालीलप्रमाणे पदनाम व संवर्गनिहाय नियुक्ती प्राधिकारी घोषित करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदनाम | संवर्ग | प्राधिकार | सक्षम नियुक्ती प्राधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | प्रमुख लिपिक | गट-ब (अराजपत्रित) | शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-एसआरव्ही-२०१६/ प्र.क्र.२९०/कार्या-१२, दि.१९ नोव्हेंबर २०१६ | सहसचिव / उपसचिव (राजशिष्टाचार) तथा पदसिद्ध संचालक, सामान्य प्रशासन विभाग |
| २ | वरिष्ठ लिपिक | गट-क | | |
| ३ | लिपिक-टंकलेखक | गट-क | | |
| ४ | नोंदणी पर्यवेक्षक | गट-क | | |
| ५ | नोंदणी लिपिक | गट-क | | |
| ६ | वाहनचालक | गट-क | | |
| ७ | कार्यादेशक | गट-क | | |
| ८ | मुख्य यांत्रिक | गट-क | | |
| ९ | सहायक यांत्रिक | गट-क | | |
| १० | वीजतंत्री तथा वातानुकुलित यांत्रिक | गट-क | | |
| ११ | सज्जक | गट-क | | |
| १२ | सुतार तथा बॉडी दुरुस्तीकार | गट-क | | |
| १३ | जोडणीकार | गट-क | | |
| १४ | कथिलगार | गट-क | | |
| १५ | सहायक कथिलगार | गट-क | | |
| १६ | लोहार | गट-क | | |
| १७ | भांडारपाल | गट-क | | |
| १८ | भांडार सहायक | गट-क | | |
| १९ | समयपाल | गट-क | | |
| २० | कुशल सहायक | गट-क | | |

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५०६१७३३४६३९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHILPA SUSHIL DESHPANDE

Digitally signed by SHILPA SUSHIL DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT,
2.5.4.20=d9c4580847bd8cf4d0521d3ff5130bd2f0d81ed958a45352894648f507b7faed, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8BAD65110E418C478564E341190F2889F781C1E4D9E81A543916EAA6A2F95E49, cn=SHILPA SUSHIL DESHPANDE
Date: 2026.05.06 17:37:40 +05'30'

**( शिल्पा देशपांडे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा.मंत्री (राजशिष्टाचार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
५. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. उपसचिव (राजशिष्टाचार), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. उपसचिव (सेवा-३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई.
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
११.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
१२.अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१४.निवड नस्ती / राशि-३